श्री.संजय माधव वाघ ,व्रणोपचारक,पशुवैदयकीय दवाखाना आश्वी खुर्द ता.संगमनेर यांचे गैरवर्तणाबाबत विभागीय चौकशी सुरु करणेकामी सादरकर्ता अधिका-याची नेमणूक करणे बाबत.

अहिल्यानगर जिल्हा परिषद
पशुसंवर्धन विभाग.

जिल्हा परिषद आदेश क्र.पसं/आस्था-1/204/2025
अहिल्यानगर , दिनांक 10/3 /2025

संदर्भ :- 1) या कार्यालयाकडील दोषारोप ज्ञापन क्र.पसं/आस्था-1/865/2024 दिनांक 09.09.2024
2) गट विकास अधिकारी पंचायत समिती संगमनेर यांचेकडील पत्र जा.क्र.आस्था1/1193 2024 दिनांक 8.10.2024
3) महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा ( शिस्त व अपिल ) नियम 1964 मधील नियम (6 )( 5 )
4) या कार्यालयाकडील आदेश जा.क्र.पसं/आस्था-1/1155/2024 दिनांक 24.12.2024

ज्याअर्थी ,श्री.संजय माधव वाघ,व्रणोपचारक पशुवैदयकीय दवाखाना आश्वी खुर्द ता.संगमनेर येथे कार्यरत असताना कार्यालयीन कामी विनापरवानगी गैरहजर राहणे,वरिष्ठांनी दिलेल्या आदेशांचा अवमान करणे अशा प्रकारचे गैरवर्तन केल्याने त्यांचे विरुध्द संदर्भ क्र.1 अन्वये,दोषारोप ठेवणेत आले होते. संदर्भ क्र.2 नुसार श्री.वाघ,यांना ज्ञापन बजावल्याची पोहोच इकडील कार्यालयास सादर केली आहे.सबब,त्यांचे विरुध्द न्याय हक्कांचे दृष्टीने चौकशी करणे आवश्यक असलेने महाराष्ट्र जिल्हा परिषदा,जिल्हा सेवा ( शिस्त व अपिल ) नियम 1964 मधील नियम 6 च्या तरतुदीनुसार संदर्भ क्र.4 चे आदेशात नमुद केलेनुसार चौकशी करणे कामी चौकशी अधिकारी यांची नियुक्ती करणेत आलेली आहे.तसेच सदरच्या चौकशीस महाराष्ट्र जिल्हा परिषदा ,जिल्हा सेवा ( शिस्त व अपिल ) नियम 1964 मधील नियम 6 च्या नियमातील तरतुदी लागू राहतील.महाराष्ट्र जिल्हा परिषदा,जिल्हा सेवा ( शिस्त व अपिल ) नियम 1964 मधील नियम 6 (5) अन्वये ,जिल्हा परिषदेची बाजू मांडण्याकरीता सादरकर्ता अधिकारी म्हणून डॉ.पुंडलीक दादाभाऊ येवले पशुधन विकास अधिकारी ( वि.) पंचायत समिती संगमनेर यांची नेमणूक करणेत येत आहे.

सादरकर्ता अधिकारी यांनी प्रत्येक चौकशीचे तारखेस हजर रहावे.त्याप्रमाणे संदर्भ क्र. 1 ते 4 मध्ये नमुद केलेले आक्षेप व पुरावे याचा सखोल अभ्यास करुन जिल्हा परिषदेची बाजू मांडावी.परिशिष्ठ क्र.तीन व चार मध्ये (दोषारोपपत्र) नमुद केलेले साक्षीदार यांना पुराव्याच्या कागदपत्रांसह चौकशीच्या दिवशी हजर ठेवावे.तसेच सोबत प्राथमिक कार्याचा करावयाचा तपशिल जोडला आहे.वरील कामी हयगय झाल्यास सादरकर्ता अधिकारी यांना जबाबदार धरण्यात येईल.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in यां संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्रमांक 202503101110012 असा आहे.

Signed by
Ashish Mukundrao Yerekar
Date: 19-03-2025 14:49:53

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर.

प्रति,

डॉ.पुंडलीक दादाभाऊ येवले पशुधन विकास अधिकारी (वि.) पंचायत समिती संगमनेर
व्दारा:-गटविकास अधिकारी (उ.श्रे.) पंचायत समिती संगमनेर.

2/- सदर आदेशाची एक प्रत सबंधितास बजावून दुस-या प्रतीवर स्वाक्षरी घेवून पोहच या कार्यालयास पाठविण्यात यावी.

प्रत:- गटविकास अधिकारी (उ.श्रे.) पंचायत समिती संगमनेर.
प्रत:- श्री.संजय माधव वाघ,व्रणोपचारक पशुवैदयकीय दवाखाना आश्वी खुर्द ता.संगमनेर
व्दारा:-गटविकास अधिकारी (उ.श्रे.) पंचायत समिती संगमनेर.
प्रत:- सहाय्यक आयुक्त , (चौकशी ) विभागिय आयुक्त कार्यालय,नाशिक विभाग,नाशिक.
प्रत:-निवड नस्ती.